श्री विठ्ठलराव जोशी चॅरिटीज ट्रस्ट संचालित
भ. क. ल. वालावलकर ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयाचे

# श्रीक्षेत्र डेरवण वार्तापत्र

ऑक्टोबर २०२४ | वर्ष – १२ अंक – १० | मासिक, पाने १२ | Regn.No. - MAHMAR/2022/86035

## अणुशास्त्रज्ञ, पद्मविभूषण डॉ. अनिल काकोडकर यांच्या अध्यक्षतेखाली वालावलकर वैद्यकीय महाविद्यालयात शास्त्रीय सल्लागार समितीची बैठक



*डावीकडून – सौ. शरयू यशवंतराव, बिरसेन आणि टालवीन कौर, डॉ. महेंद्र सोनावणे, डॉ. सुनील नाडकर्णी, श्री. विकास वालावलकर, श्री. अशोकराव जोशी, डॉ. अनिल काकोडकर, श्री. जयंत बांठिया, डॉ. ऋता मुल्हेरकर, डॉ. सुवर्णा पाटील, डॉ. श्रीपाद बाणावली, डॉ. सुनीती गोरे, डॉ. अय्यर, डॉ. नीलम शिरसाट, पाठीमागे डॉ. हसबनीस, डॉ. गजानन वेल्हाळ, डॉ. राहुल चोपडे, डॉ. आनंद जोशी, श्री. जोगळेकर, डॉ. नेताजी पाटील, डॉ. ओंकार शहापूरकर*

दि. २८ सप्टेंबर रोजी भ.क.ल. वालावलकर महाविद्यालय, डेरवण येथे शास्त्रीय सल्लागार समितीची १८वी बैठक डॉ. अनिल काकोडकर यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. ही समिती ग्रामीण भागातील समाजाचे प्रश्न समजावून घेणे आणि त्याकरिता वैद्यकीय प्राध्यापक आणि विद्यार्थी यांनी केलेल्या संशोधनावर चर्चा आणि मार्गदर्शन करते. या बैठकीकरिता समितीचे अन्य मान्यवर सदस्य टाटा मेमोरियल सेंटरचे अॅकॅडेमिक डायरेक्टर डॉ. श्रीपाद बाणावली, डॉ. ऋता मुल्हेरकर, डॉ. जयंत बांठिया, माजी मुख्य सचिव महाराष्ट्र राज्य, हेदेखील उपस्थित होते, डॉ. अरविंद नातू यांनी दूरस्थ पद्धतीने बैठकीला उपस्थित दर्शवली.

या व्यतिरिक्त टाटा इन्स्टिट्युट ऑफ फंडामेंटल रिसर्चच्या ARUMDA, हैद्राबाद शाखेतील प्रो. डॉ. महेंद्र सोनावणे, बिरसेन आणि टालवीन कौर आदी मान्यवर या बैठकीसाठी उपस्थित होते. टाटा इन्स्टिट्युट ऑफ फंडामेंटल रिसर्च आणि वालावलकर महाविद्यालय यांच्या सहकार्याने होणाऱ्या सर्व संशोधन उपक्रमांची माहिती त्यांनी सादर केली. समितीसमोर पदव्युत्तर विद्यार्थ्यांनी एम.डी. मेडिसिन (पीजी रेसिडेंट्स) विभागातर्फे सुरू असलेल्या प्रकल्पांचे संक्षिप्त सादरीकरण केले. डॉ. सुवर्णा पाटील यांनी 'डेरवण कोहर्ट'चे अपडेट्स आणि संस्थेच्या उपक्रमांचा आढावा सादर केला.

कोकण विभागातील किशोरवयीन मुलांमध्ये मधुमेहपूर्व लक्षणे, रक्तातील कॉपर, झिंक आणि जीवनसत्त्वे, कोकणातील मधुमेही रुग्णांमध्ये इन्सुलिन, युरिक अॅसिड, होमोसिस्टीनची पातळी अशा अनेक महत्त्वाच्या विषयांवर डॉ. वैभव राऊत, डॉ. आशिष गायकवाड, डॉ. अनिकेत खलाडकर, डॉ. अजय पाटील, डॉ. लोचन मालंडकर, डॉ. प्रवीण बागड, डॉ. वैभव मेथी, डॉ. अक्षय बोंदारे यांनी आपले सादरीकरण केले.

आय.सी.एम.आर. संलग्नित 'सेंटर फॉर क्रॉनिक डिसीझेस, दिल्ली ही संस्था भारतातील सहा वैद्यकीय महाविद्यालयात 'रिसर्च फॉर रुरल हेल्थकेअर'ची स्थापना करणार आहे आणि त्या यादीत वालावलकर महाविद्यालयाचे नाव समाविष्ट केले गेले आहे, ही एक अभिमानाची बाब असून त्याद्वारे ग्रामीण भारतातील विषमता दूर करण्यासाठी आणि दर्जेदार प्राथमिक सेवेत सुधारणा करण्यासाठी एक महत्त्वाकांक्षी उपक्रम राबवण्यात येणार आहे अशी माहिती

डॉ. गजाजन वेल्हाळ, डिपार्टमेंट ऑफ कॉम्युनिटी मेडिसिनचे मुख्य अध्यापक, यांनी दिली.

याशिवाय ब्रिटनमधील स्कॉटलंड येथील डंडी विद्यापीठातील वैद्यकीय विद्यार्थी पोस्टिंगकरता जानेवारी २०२५मध्ये एक महिन्यासाठी इन्स्टिट्यूटला भेट देतील, ही अतिशय अभिमानाची गोष्ट आहे. रसायनशास्त्र आणि जीवशास्त्रासह विविध क्षेत्रात संस्था मदत करू शकते, असे डॉ. नातू यांनी सुचवले. 'स्टेम सेल' या विषयावरील संशोधनावरही डॉ. ऋता मुल्हेरकर आणि डॉ. सुनील नाडकर्णी तसेच अंकिता बेंद्रे आणि शर्वाणी डोळे यांनी प्रोजेक्ट सादरीकरण केले. कोकणात मुबलक उपलब्ध असलेल्या फणसाचे फायदे, मधमाशीतून मिळणारे 'प्रोपोलिस' आणि त्याची उपचारात्मक क्षमता – यावर डॉ. गौरी पुरोहित आणि डॉ. रोहित भट यांनी सादरीकरण केले.

अशा अनेक क्षेत्रीय आयामांवर चर्चा करताना संस्थेची नाळ ग्रामीण लोकांशी जुळावी आणि त्यांचे आयुष्य सुधारावे म्हणून ग्रामीण सक्षमीकरण आणि सामुदायिक आरोग्य (रीच)संबंधी अद्ययावत माहिती डॉ. ज्योती अय्यर यांनी सादर केले. संस्थेने हिरव्या पालेभाज्या पिकविण्यासाठी वापरल्या गेलेल्या दोन बांबू पॉलीहाऊसच्या यशस्वी बांधकामावर चर्चा झाली. हस्तकला आणि पौष्टिक उत्पादने यासारख्या सक्षम उपक्रमांच्या यशावर त्यांनी प्रकाश टाकला आणि या उपक्रमांना पुढील स्तरावर नेण्याबद्दल आशावाद व्यक्त केला.

अशा विविध विषयांवर सुरू असलेल्या सर्वांगीण उपक्रमांचे कौतुक करत शास्त्रज्ञ डॉक्टर अनिल काकोडकर यांनी समाधान व्यक्त केले. आरोग्य, शिक्षण आणि ग्रामीण समाजाचे स्वावलंबन ह्यात संस्थेने केलेल्या विकासाचा आलेख असाच उंचावत राहो अशा शुभेच्छा त्यांनी बैठकीच्या अखेरीस व्यक्त केल्या.

## 'मेडिको लीगल केस हॅण्डलिंग' आणि 'फोरेन्सिक प्रॅक्टिसेस' याविषयी कार्यशाळा




*माननीय पोलीस अधीक्षक रत्नागिरी जिल्हा, श्री. धनंजय कुलकर्णी; उपविभागीय पोलिस अधिकारी चिपळूण विभाग, श्री राजेंद्र कुमार राजमाने तसेच श्री जयंत गायकवाड, साहाय्यक पोलीस निरीक्षक सावर्डे पोलीस ठाणे, डॉ. सुवर्णा नेताजी पाटील, डॉ. नेताजी पाटील आणि अन्य*

दि.२२.०९.२४ रोजी भक्तश्रेष्ठ कमलाकरपंत वालावलकर ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, सावर्डे येथे 'मेडिको लीगल केस हॅण्डलिंग' आणि 'फोरेन्सिक प्रॅक्टिसेस' या विषयावर रत्नागिरी जिल्हा पोलीस दलातील पोलीस अधिकारी/पोलीस अंमलदार यांच्यासाठी कार्यशाळा/प्रशिक्षण सकाळी नऊ ते सायंकाळी चार वाजेपर्यंत आयोजित करण्यात आले होते.

ह्या प्रशिक्षणाला माननीय पोलीस अधीक्षक रत्नागिरी जिल्हा, श्री. धनंजय कुलकर्णी; उपविभागीय पोलीस अधिकारी चिपळूण विभाग, श्री. राजेंद्र कुमार राजमाने तसेच श्री. जयंत गायकवाड, साहाय्यक पोलीस निरीक्षक सावर्डे पोलीस ठाणे, यांनी आवर्जून उपस्थिती नोंदवली. वैद्यकीय संचालिका डॉ. सुवर्णा पाटील, डॉ. नेताजी पाटील, डॉ. मानसिंग घाटगे, फोरेन्सिक विभाग प्रमुख डॉ. अविनाश वाघमोडे आणि सहयोगी प्राध्यापक डॉक्टर लक्ष्मण फड तसेच रत्नागिरी जिल्ह्यातील १५० पोलीस अधिकारी, अंमलदार उपस्थित होते. ही कार्यशाळा हा एक नावीन्यपूर्ण उपक्रम असून ट्रस्टने केलेल्या सामाजिक आणि आरोग्यविषयक कार्याची वाखाणणी श्री. धनंजय कुलकर्णी यांनी सर्व पोलीस कर्मचाऱ्यांना संबोधताना केली.

# कोलंबो येथील ड्रग ॲडव्हायझरी प्रोग्राममध्ये वालावलकर रुग्णालयातील मानसोपचार तज्ज्ञांचे प्रशिक्षण




आज जगात सर्वत्र व्यसनाधीनतेत मोठ्या प्रमाणात वाढ झालेली आहे आणि खरंतर चिंतेची बाब ही आहे की यामध्ये लहान मुले व तरुणांमध्ये व्यसनाधीनतेचे प्रमाण सगळ्यात जास्त आहे. आणि याचा परिणाम म्हणून, तरुणांमध्ये मानसिक आजार व गुन्हेगारीतही वाढ झाली आहे.

आपली तरुण पिढी व्यसनांना बळी पडू नये म्हणून सातत्याने समाजात या आजाराविषयी जागरूकता निर्माण करणे हे फार गरजेचे आहे. त्याचप्रमाणे या समस्येला सामोरे जाताना त्यावर योग्य उपचार पद्धती अवलंबणे गरजेचे आहे. याचे गांभीर्य लक्षात घेता गेल्या अनेक वर्षांपासून आंतरराष्ट्रीय स्तरावर विविध उपक्रम राबविले जात आहेत, यापैकी एक म्हणजे CPDAP (Colombo Plan Drug Advisory Programme), कोलंबो, श्रीलंका ही आंतरराष्ट्रीय संस्था १९७३ पासून व्यसनाधीनता या आजारावर संशोधन करून नवनवीन उपचार पद्धती व यावर प्रतिबंध कसा करावा यासाठी जगातील वेगवेगळ्या देशातील या क्षेत्रात काम करणाऱ्या लोकांना प्रशिक्षण देते.

यातच नव्याने विकसित केलेली उपचार पद्धती म्हणजेच 'चाईल्ड करिक्युलम'. याच प्रशिक्षणासाठी 'कोलंबो प्लॅन ड्रग ॲडव्हायझरी प्रोग्राम (CPDAP)' व 'U.S.Department of State Bureau of International Narcotics and Law Enforcement' यांच्याद्वारे, दि. ११ ते १७ सप्टेंबर, २०२४ रोजी कोलंबो (श्रीलंका) येथे कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. या प्रशिक्षणासाठी भारत, श्रीलंका व मालदीव या देशातून प्रशिक्षणार्थी निवडण्यात आले होते. भ.क.ल. वालावलकर रुग्णालयातील मानसोपचार विभागातील मानसशास्त्रज्ञ रूपाली चव्हाण आणि स्वाती सोनवणे यांची या प्रशिक्षणासाठी निवड करण्यात आली होती. या प्रशिक्षणामध्ये लहान मुलांमध्ये वाढणाऱ्या व्यसनावर प्रतिबंध कसा करावा व यासाठी कोणकोणत्या उपचार पद्धतीचा अवलंब करावा यावर प्रशिक्षण देण्यात आले. या प्रशिक्षणाचा उपयोग लहान वयात वाढणाऱ्या व्यसनाधीनतेवर उपचार करण्यासाठी तसेच त्यावर जागरूकता निर्माण करण्यासाठी होईल अशी आम्हाला खात्री आहे आणि महत्त्वाचे म्हणजे आता हे उपचार भ.क.ल. वालावलकर रुग्णालयात उपलब्ध आहेत.



*रुपाली चव्हाण (डावीकडे) आयोजकांकडून प्रमाणपत्र स्वीकारताना*



*स्वाती सोनावणे (डावीकडे) आयोजकांकडून प्रमाणपत्र स्वीकारताना*

# डेरवण रुग्णालयात रेडिऑलॉजी प्रॅक्टिकल क्रॅश कोर्स कार्यशाळा




रेडिऑलॉजी क्रॅश कोर्समध्ये सहभागी विद्यार्थी आणि अध्यापक




डावीकडून डॉ. आनंद हातगावकर. डॉ. नेताजी पाटील, डॉ आनंद गजकोष, डॉ. पद्मा बढे, डॉ. अभिजित राऊत, डॉ एस. के. जोशी, डॉ. अभिमन्यू केळकर, डॉ. अनुराधा केळकर , डॉ महेंद्र गुलाटी

वालावलकर वैद्यकीय महाविद्यालय नेहमीच प्रशिक्षणावर भर देत आले आहे. रेडिऑलॉजी प्रॅक्टिकल क्रॅश कोर्स या बहुप्रतिक्षित कार्यशाळेचे उद्घाटन दि. २० सप्टेंबर २०२४ रोजी बी.के.एल. वालावलकर ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालयात पार पडले. तीन दिवस चाललेल्या या कार्यशाळेचा उद्देश सहभागी विद्यार्थ्यांना रेडिऑलॉजीमध्ये सखोल ज्ञान आणि प्रात्यक्षिक कौशल्ये प्रदान करणे हा होता. ह्या कार्यशाळेमध्ये श्वसन, अस्थिमज्जा, जठरांत्र, मज्जासंस्था आणि मूत्रजनन संस्थेवर विशेष लक्ष केंद्रित केले गेले. या कार्यशाळेसाठी नगर, लोणी, मुंबई, पुणे, सांगली इत्यादी ठिकाणांहून १६ रेडिऑलॉजीच्या विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.

कार्यक्रमासाठी 'धारवाड युनिव्हर्सिटी'चे डॉ. एस. के. जोशी, माजी कुलगुरू व रेडिऑलॉजीचे प्राध्यापक, डॉ. पद्मा बढे, प्राध्यापक रेडिऑलॉजी विभाग, 'के.ई.एम.'; मुंबई, डॉ. आनंद हातगावकर, प्राध्यापक आणि विभागप्रमुख, 'दत्ता मेघे वैद्यकीय महाविद्यालय'; नागपूर, डॉ. अनुराधा केळकर, रेडिऑलॉजी प्रोफेसर, 'डी.वाय. पाटील मेडिकल कॉलेज'; पुणे आणि डॉ. अभिमन्यू केळकर, प्रोफेसर, 'भारती मेडिकल कॉलेज'; पुण्यातील सिनिअर रेडिऑलॉजिस्ट डॉ. महेंद्र गुलाटी आदी वरिष्ठ रेडिऑलॉजिस्ट आवर्जून उपस्थित होते. तसेच मुंबईहून 'टाटा मेमोरियल हॉस्पिटल'चे रेडिऑलॉजी विभागप्रमुख, डॉ. सुयश कुलकर्णी, 'हरकिसनदास हॉस्पिटल'चे रेडिऑलॉजिस्ट डॉ. अभिजित राऊत हेही सहभागी झाले होते. वालावलकर रुग्णालयातील डॉ. निनाद नाफडे, डॉ. आनंद गजकोष, डॉ. नेताजी पाटील ह्यांनी कार्यशाळेचे आयोजन केले होते. कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांची ओळख करून देऊन करण्यात आली. या उद्घाटन समारंभाला आदरणीय अधिष्ठाता डॉ. मानसिंगराव घाटगे, डॉ. आनंद जोशी, डॉ. सुनील नाडकर्णी उपस्थित होते.

विद्यार्थ्यांनी परीक्षेला शांत आणि स्थिर मानसिकतेने कसे सामोरे जावे तसेच परीक्षेदरम्यान येणाऱ्या अडचणी कशा सोडवाव्यात यावर उत्तम मार्गदर्शन करण्यात आले. ह्या शिवाय कॅन्सर, ट्युमर्स, मेंदूचे आजार, आतड्याचे आजार ह्या विषयातील एक्स-रे, एम.आर. आय., सी. टी. स्कॅन यांचे सादरीकरण करून आजाराचे योग्य निदान कसे करावे यावर विशेष भर दिला गेला. जलद निदान झाले तरच उपाययोजना करणे शक्य होते आणि त्याकरिता रेडिऑलॉजी विभाग मोलाचे योगदान देत असतो असे मत तज्ज्ञांनी मांडले.

डॉ. सुनील नाडकर्णी यांनी रुग्णांच्या सेवेसाठी प्रेरणादायी ठरतील असे त्यांचे वैयक्तिक अनुभव सांगितले आणि उत्तम उपचारासाठी सातत्याने शिकत राहण्याचे महत्त्व पटवून दिले. या शिबिरामुळे कार्यशाळाचे वैद्यकीय शिक्षणात असलेले महत्त्व अधोरेखित झाले आणि उत्तम आयोजनाबद्दल विद्यार्थ्यांनी महाविद्यालयाचे आभार मानले.

ह्या प्रॅक्टिकल क्रॅश कोर्सचे वैशिष्ट्य म्हणजे अशा प्रकारचा कोर्स आतापर्यंत कुठेही आयोजित केला गेला नव्हता. याचा उपयोग विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढवण्यासाठी झाला. परीक्षेत कशा पद्धतीचे प्रश्न विचारले जाऊ शकतात. तसेच रुग्णनिदान करण्यासाठी कशा पद्धतीची वापर केला जातो याविषयी मार्गदर्शन करण्यात आले. सध्याचे युग हे गूगल किंवा डेटाबेस आहे. पूर्वीची जी गुरुकुल पद्धत होती त्यातील विद्यार्थी व शिक्षक यांच्यातले जे नाते होते ते सगळे संपुष्टात येऊन, सध्या विद्यार्थ्यांनी गूगलला गुरू करून घेतलेला आहे आणि तो फार मोठा हानिकारक ठरू शकतो. शिक्षणासाठी पूर्वी विद्यार्थी जसे गुरूंच्या घरी जाऊन शिक्षण घ्यायचे, त्याप्रमाणे सगळे हाडांचे शिक्षक इथे वेगवेगळ्या प्रकारे जमलेले होते. त्यांनी विद्यार्थ्यांना सगळ्या गोष्टी आत्मसात कशा करायच्या हे शिकवलं. अशा पद्धतीची शिकवणी सध्या फार दुर्मिळ होत चाललेली आहे. अशा पद्धतीने रुग्णालयाने व ट्रस्टने सुरू केलेल्या या उपक्रमाचा विद्यार्थांना परीक्षेच्या अभ्यासासाठी आणि त्यांचा भावी आयुष्यसाठीही मोठा फायदा होणार आहे



डावीकडून डॉ. निनाद नाफडे, डॉ. एस.के. जोशी, डॉ. हातगावकर, डॉ. आयुषी खवस (रेसिडेन्ट तेडिऑलॉजिस्ट) हिच्याशी चर्चा करताना



डॉ. एस.के. जोशी, मार्गदर्शन करताना

# सहभागींचे अभिप्राय-

**The Poem : Dedicated to the course**
**by Dr. Padma V. Badhe**

*It wasTata Memorial during a conference, and a chance meeting*
*I was invited for Radiology practical crash course after a fleeting briefing*
*In came Dr. Netaji's phone call*
*Who is an inhouse pillar tall*
*the whatsapp invite and mail followed in due course*
*He then assigned work to the work force like a diligent coach horse.*
*The nitty gritty of the event was planned on a zoom discourse*
*To decide upon the mentor, student delegate cases time and management course.*
*Dates were finalised in due course*
*Tickets booked by the work force*
*There were*
*long cases with a specifically assigned coach horse*
*Short cases with a specifically assigned coach horse*
*Spotters sessions had a dual coach horse.*
*Dawned the day to come September in the campus of the BKLWRMCollege*
*A store house of Bondage and foliage*
*Participants offloaded their luggage*
*To Remove their mental blockage*
*Rummage and ruffle their passage with wantage knowledge*
*A quick inauguration in the presence of stalwarts and dean followed by distribution of cases each day*
*be it Respiratory MSK GIT GUT CNS USG Table Viva for mentees to slay*
*Followed by mentor and meñtees going hoarse*
*over the platter of sessions of academic mini, mid and multi course.*
*Respiratory system had stalwarts of SKJoshi sir, AKelkar madam,*
*MSK system had stalwarts of NNaphade sir and Anand Hatgaonkar sir*
*GIT had Padma Badhe madam and Abhijit Raut sir*
*CNS had Abhimanyu Kelkar sir and Vasudeo Bhide sir*
*GUT had Anand Gajakos sir and Yogendra Sachdeo sir*
*USG had Yogendra Sachdeo sir and Mahendra Gulati sir*
*Table Viva was by Suyash Kulkarni sir going hoarse on the race course.*
*Came skills beyond Radiology by*
*Anand Hatgaonkar with rib tickling life exercises*
*Interspersed with peels of laughter from all to energise the otherwise sagging paradise.*
*then came the time to bid bye with a heavy hoarse voice*
*Sayonara Sayonara there is no choice*
*Till we meet again Rejuvenate and rejoice.*



**Dr Abhijeet Raut Radiologist K...**
Dear Dr Anand ,infact very thankful for the nicely organised event ,where everything was planned very carefully and with great affection like a family affair.Thanks for inviting me and being part of the programme! Hopefully students are benefitted from my contribution! 🙏🙏🙏 20:12

**Dr Anand Gajkosh Prof Radio**
Very much thanks for all the respected faculties 🙏🙏🙏
All of you respected faculties have really worked hard and helped us alot in each and every aspect for conducting this Crash course programme 2024 and making it a success.
All the students are very much happy and delighted, conveyed their satisfaction regarding this programme to all of Us.
Indeed it was a team work.
Thank you very much for your guidance and special efforts.

**Anuradha Kelakar**
It was a very educative, healthy and happy atmosphere in which the course was conducted. Thanks to all. Wish to mee you all soon

**Dr S K Joshi Dean Dharwad**
It was a very pleasurable event, lucky to be part of that. 20:03
I could meet many stalwarts in our fraternity. 20:04
I thank Dr.Ninaad, Dr. Netaji and Dr. Gajakosh along with all the staff for inviting me giving the pleasure time with u. 20:09

**Ninad Nafade**
Biggest thanks to all for abiding by our schedule, our concept and cajoling the students rather than having an examiner approach.

Next time around, we will improve over the shortcomings if any.

It was like a pilgrimage for me, meeting all saints in the temple of knowledge.

The support staff was phenomenal. Thanks to them too. 20:14

**Dr Anand Hatgaonkar Prof Rad...**
All sessions were radioactive ☢. Teachers as well as students. Active Radiologist. Not to forget 12 hours teaching and learning. Great efforts at both ends. Students all praise for their patience 🙏🙏🙏 08:30

**Dr Abhimanyu Kelkar Pune**
Agreed it was a great experience...kudos to the management abilities of radiology faculty of Bklw...
Special thanks to Netaji and all students.
I couldn't manage taking cases this time... Will be better next time.
Meeting SK is always a joy.

# 'कान-नाक-घसा' विभागातर्फे 'सायनस'साठी मोफत शस्त्रक्रिया शिबिर



*खालून पहिली ओळ- डॉ. राजीव केणी, डॉ. प्रशांत मूल्या,डॉ. संदीप साठे डॉ. वैशाली बापट, डॉ. पुष्पा भूरूटे, डॉ. प्रतीक शहाणे; पाठीमागे डॉ. संघमित्रा फुले, डॉ. सुवर्णा पाटील, डॉ. सचिन निलाखे, डॉ. मिलिंद नवलाखे, डॉ. मानसिंगराव घाटगे, डॉ. राहुल गोसावी , डॉ. शीतल धरणगुट्टे तिसऱ्या ओळीमध्ये सगळे पदव्युत्तर विद्यार्थी*

दि. २१ व २२ सप्टेंबर रोजी वालावलकर हॉस्पिटलच्या 'कान-नाक-घसा' विभागातर्फे 'सायनस'वरील आजारासाठी मोफत शस्त्रक्रिया शिबिर आयोजित करण्यात आले होते. या शिबिराला रुग्णांनी भरघोस प्रतिसाद दिला आणि त्यातील २० रुग्णांवर दुर्बिणीद्वारे शस्त्रक्रिया केल्या गेल्या. या शिबिरासाठी खास मुंबई तसेच सांगली-मिरजवरून २५ कान-नाक-घसा तज्ज्ञ आले होते. यामध्ये के.इ.एम. मुंबईचे डॉक्टर मिलिंद नवलाखे, सांगलीचे डॉक्टर सचिन निलाखे व मिरजचे डॉक्टर राहुल गोसावी या तज्ज्ञ डॉक्टरांचा समावेश होता. या शिबिरामध्ये 'सायनस'वरील आजारासाठीच्या अतिशय कठीण अशा २० शस्त्रक्रिया दुर्बिणीद्वारे यशस्विरीत्या करण्यात आल्या.

या शिबिरामध्ये या विषयातील तज्ज्ञांच्या विचारांचे तसेच एकमेकांकडे असलेल्या विविध शैलींचे आदानप्रदान झाले, यामुळे नवोदित तज्ज्ञांसाठी हे शिबिर म्हणजे ज्ञानाची मेजवानी ठरली. शिवाय शिबिरामुळे आपल्या सायनसवरील आजारावर तज्ज्ञांकडून मोफत शस्त्रक्रिया करून घेण्याची सुवर्णसंधी रुग्णांना मिळाली.

भूलतज्ज्ञ डॉ. लीना ठाकूर, डॉ. प्रदीप संदीप राव, डॉ. गौरव बाविस्कर, डॉ. मनीषा यांच्यामुळे दोन दिवसीय शिबिरात वीस शस्त्रक्रिया करणे शक्य झाले. हॉस्पिटलचा कान-नाक-घसा विभाग दिवसेंदिवस यशाची विविध शिखरे गाठत आहे व रुग्णांसाठी तारणहार बनत आहे, हे शिबिर यशस्वी होण्याकरिता अहोरात्र मेहनत घेणारे डॉ. प्रतीक शहाणे व डॉ. राजीव केणी यांचे सर्वत्र कौतुक होत आहे.


## कोकण रेल्वेचे वैद्यकीय अधिकारी डॉ. नागनाथ जिलेवाड यांची रुग्णालयाला सदिच्छा भेट



*डावीकडून - कोकण रेल्वे अधिकारी श्री.आनंदनाथ केतकर, अभियंता डॉ. सुधीरकुमार नाईक, डॉ. नागनाथ जिलेवाड, डॉ. नेताजी पाटील*

कोकण रेल्वेचे वैद्यकीय अधिकारी डॉ. नागनाथ जिलेवाड, रत्नागिरी, यांनी वालावलकर रुग्णालयाला सदिच्छा भेट दिली. या भेटीमध्ये त्यांनी हॉस्पिटलमध्ये सुरू असलेल्या वेगवेगळ्या सोयी सुविधांची व उपक्रमाची माहिती घेतली आणि ग्रामीण दुर्गम भागातील जनतेसाठी सुरू असलेल्या विविधांगी कार्याची प्रशंसा केली.

## माननीय पोलीस अधीक्षक, रत्नागिरी जिल्हा, श्री. धनंजय कुलकर्णी यांनी भेटीच्या वेळी दिलेला अभिप्राय



Visitors Book

| Date | Visitors Name | Contact No. | E-mail / Address | Your Valuable Comments & Suggestions |
|---|---|---|---|---|
| 22/09/24 | Dhananjay Kulkarni | [illegible] | | Today got an opportunity to visit the medical college for a seminar organized by the college on medico-legal cases. I am really impressed with the work and service being offered by Walawalkar trust in the Konkan region. Police and the trust has good bonding for the cause and hope that will be forever. |

# एस.व्ही.जे.सी.टी.च्या विद्यार्थ्यांनी हसतखेळत घेतली संस्कारांची दीक्षा



सौ. शोभाताई नाखरे व्याख्यान देताना

सौ. शोभाताई नाखरे, 'द सेंट्रल स्कूल फॉर द डेफ' या शाळेच्या माजी मुख्याध्यापिका तसेच आदर्श शिक्षिका, लेखिका, निवेदिका यांची व्याख्यानमाला शाळेत आयोजित करण्यात आली होती.

व्याख्यानाची विभागणी चार टप्प्यात करण्यात आली होती. इयत्ता पहिली ते सातवीसाठी 'चला आनंद घेऊ या', इयत्ता आठवी ते बारावीसाठी 'फंडा सकारात्मकतेचा', पालकांसाठी 'सुजाण पालकत्व' आणि सर्व शिक्षकांसाठी 'शिक्षक - एक सामाजिक भान' या विषयांवर व्याख्यानांचे आयोजन करण्यात आले होते.

इयत्ता पहिली ते बारावीच्या विद्यार्थ्यांशी संवाद साधताना शोभाताईंनी उत्तम वर्तणुकीचे धडे दिले. प्रातःस्मरणाचे महत्त्व, भूमीला वंदन करण्यामागील हेतू संस्कृत श्लोक व अर्थासह स्पष्ट केला, वाकून नमस्कार करण्याचे महत्त्व तसेच आईला सहजपणे कशी मदत करता येईल, शरीराच्या स्वच्छतेबरोबर मनाची स्वच्छता कशी ठेवता येईल, अशा विद्यार्थ्यांमध्ये मूल्याधिष्ठित विकासासाठी आवश्यक घटकांचे मार्गदर्शन करत असताना प्रत्येक वेळी उदाहरण व त्यामागे दडलेला वैज्ञानिक दृष्टिकोन असे सहज सुलभ शैलीत मार्गदर्शन केले. तीन थेंबांच्या कथेतून ताईंनी विद्यार्थ्यांना कायम सकारात्मक राहण्याचा सल्ला दिला. यशाच्या शिखरावर पोहोचायचे असेल तर ध्येय निश्चित करणे आवश्यक असते हे सांगताना भारतरत्न भीमसेन जोशी आणि टेनिसपटू लिएँडर पेस यांच्या लहानपणीच्या गोष्टींतून ध्येय निश्चितीचे महत्त्व सांगितले.

पालकांशी संवाद साधताना 'सुजाण पालकत्व' म्हणजे नक्की काय याविषयी ताईंनी पालकांना मार्गदर्शन केले. आपण जसे वागतो तशीच मुलंही वागत असतात त्यामुळे पालक म्हणून आपणच जबाबदारीने वागले व बोलले पाहिजे असे त्या म्हणाल्या. आपल्या पाल्याचा उत्तम मित्र बना, त्यांना वेळ द्या, त्यांच्यासोबत बोला, अपशब्द वापरू नका, टोचून बोलू नका यांसारखे मौलिक सल्ले ताईंनी आपल्या मार्गदर्शनातून पालकांना दिले.

शिक्षकांशी सुसंवाद साधत असताना, विद्यार्थ्यांमध्ये चांगले बदल घडवायचे असतील तर सर्वप्रथम समोरील विद्यार्थ्यांचे पालक व्हा, असे आवाहन त्यांनी केले. आपला विषय विद्यार्थ्यांना समजावा यासाठी प्रयत्नांची शिकस्त करा, त्यांना प्रत्यक्ष अनुभव देण्याचा प्रयत्न करा. शाळेत व समाजात वावरताना आपण शिक्षक असल्याचे भान ठेवणे आवश्यक असल्याचेही त्या म्हणाल्या.

व्याख्यानाच्या उत्तरार्धात ताईंनी दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी केलेल्या अतुलनीय कार्याविषयी सांगितले. दिव्यांग मुलांना एखादा विषय समजावताना शिकवताना येणाऱ्या समस्या, एकेका अक्षराचा उच्चार ऐकण्यासाठी आईवडिलांचे आसुसलेले कान, आपल्या व्यंगावर मात करून विविध क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या विद्यार्थ्यांच्या सकारात्मकतेची ताकद याविषयी विद्यार्थी व पालकांना सांगताना ताई म्हणाल्या की, सर्व अवयव जागच्याजागी असलेले धडधाकट शरीर तुम्हाआम्हाला मिळाले हीच अनमोल भेट आहे, त्यासाठी कायम देवाचे आभार माना. आयुष्यात एखादा दिव्यांग मित्र बनवा, त्याच्या सहवासात तुम्हाला खूप काही शिकता येईल, असेही त्या म्हणाल्या.

व्याख्यानात शोभाताईंनी विविध आनंददायी कविता, विनोद यांची गुंफण रचल्याने विद्यार्थ्यांनी, पालक व शिक्षकांनी व्याख्यानाचा आनंद लुटला आणि दिव्यांग विद्यार्थ्यांच्या प्रेरक कथा ऐकताना काहींना अश्रूदेखील अनावर झाले.

## सौ. शोभा गोपाळकृष्ण नाखरे : परिचय

- एम.ए. (संस्कृत, मराठी)
- बी.ए.ला मुंबई विद्यापीठात तिसरा क्रमांक
- लोटस फाउंडेशन स्कॉलरशिपच्या मानकरी
- दहावीच्या विद्यार्थ्यांना १२ वर्षे संस्कृतचे अध्यापन
- १९८७पासून कर्णबधीर मुलांना अध्यापन
- 'द सेंट्रल स्कूल ऑफ द डेफ'च्या माजी मुख्याध्यापिका
- NCERT दिल्लीचा राष्ट्रीय पुरस्कार
- ८ मार्च २००९ - महापौरांकडून कर्तृत्ववान महिला पुरस्कार
- ५ सप्टेंबर २०१३ - राष्ट्रपती पुरस्कार
- नामवंत वृत्तपत्रात लेखन, पुस्तक परिक्षण, शैक्षणिक निबंध
- अनेक सामाजिक, ऐतिहासिक महत्त्वाच्या विषयांवर व्याख्याने
- अनेक सांगितिक, साहित्यिक कार्यक्रमांचे सूत्रसंचालन

# वृक्षवल्ली आम्हां सोयरे वनचरें .......



रक्तचंदन



महोगनी

दि. २२ मे २०२४ रोजी श्रीक्षेत्र डेरवण, तालुका चिपळूण, जिल्हा रत्नागिरी येथे शिव-समर्थ गड, श्रीसंत सीतारामबुवा वालावलकर मंदिर, भक्तश्रेष्ठ कमलाकरपंत ल. वालावलकर हॉस्पिटल आणि वैद्यकीय महाविद्यालय परिसरात थोड्याच कालावधीसाठी पण अतितीव्र स्वरूपाचे चक्रीवादळ झाले. काही मिनिटांच्याच या वादळामध्ये खूप मोठमोठे वृक्ष उन्मळून पडले, तर कित्येक उंच वाढलेल्या वृक्षांच्या मोठमोठाल्या फांद्या मोडून पडल्या. आपल्या डेरेदारपणाने सर्वांना सावली देऊन डौलात उभे असणारे हे अवाढव्य वृक्ष उघडे, बोडके झालेत. आंबा, चिकू, नारळ, जांभूळ, फणस, महोगनी, आईन इत्यादी सर्व प्रकारचे वृक्ष उन्मळून पडल्याने हा परिसर ओकाबोका दिसू लागला होता. या परिसरातील वनराई हे एक या परिसराचे वैभवच होते. ते वैभव पुनर्स्थापित करण्यासाठी जून महिन्यात अगदी तत्परतेने पाऊस सुरू होताच खड्डे घेऊन नवीन झाडे लावण्यात आली. मोहोगनीची ३५५, शेंद्रीची ३५, दुर्मिळ रक्तचंदनाची ३०, गुंजेच्या वेली २२, नारळाची झाडे ५०, नरक्याची १८ अशी ५१० नवीन झाडे लावण्यात आली आहेत. याशिवाय आणखीन अशीच कोकणात चांगली वाढणारी ५०० झाडे लावण्यासाठी पिशव्यांमध्ये खत, माती भरून रोपे लावून ठेवली आहेत. या लहान रोपांची सहा महिन्यातच चांगली वाढ होईल आणि ही रोपे लावण्याचे नियोजन केलेले आहे.

वादळात पिंजलेल्या, मोडून पडलेल्या फांद्या, पाऊस कमी होताच, म्हणजेच फांदीवरील निसरडेपणा कमी होताच, त्या व्यवस्थित कापून; त्याचबरोबर नवीन आलेली फूट विरळ करून झाडांचा डौलदारपणा पूर्ववत करण्यात येईल. कोकणात आढळणाऱ्या आणि केवळ या परिसरातील पारंपरिक वृक्षांच्या छायेत वावरणाऱ्या पक्षांना त्यांचा हक्काचा आसरा पूर्ववत करावयाचा हा प्रयत्न कृषितज्ज्ञ डॉ. हसबनीस यांच्या मार्गदर्शनाखाली उत्साहाने सुरू आहे.



बकुळ



शेंद्री

# १०व्या बी.के.एल. वालावलकर क्रॉस कंट्री स्पर्धेचे जल्लोषात आयोजन



स्पर्धेला तरुणांचा उत्साही प्रतिसाद




डावीकडून श्रीकांत पराडकर, योगेश विचारे, ईशा जाधव, विजेते धावपटू, श्री. सचिन मांडवकर आणि संदीप तावडे.

श्री विठ्ठलराव जोशी चॅरिटीज ट्रस्ट क्रीडासंकुलात आयोजित दहावी भक्तश्रेष्ठ कमलाकरपंत वालावलकर क्रॉसकंट्री स्पर्धा उत्साही वातावरणात पार पडली. राज्यभरातून ६०० पेक्षा अधिक स्पर्धकांनी सहभाग नोंदविला होता. चिपळूण तालुक्याने या स्पर्धेमध्ये आपले वर्चस्व राखले.

ही स्पर्धा १२, १४, १६ आणि १८ वयोगटातील मुले व मुली या आठ विभागात झाली. सहभागी खेळाडूंना टी-शर्ट वितरीत करण्यात आले होते. स्पर्धेचे उद्घाटन आंतरराष्ट्रीय धावपटू ईशा जाधव हिच्या हस्ते करण्यात आले. या वेळी डॉ. मानसिंग घाडगे, डॉ. आनंद जोशी, डॉ. नेताजी पाटील, प्रा. चंद्रशेखर एल., रत्नागिरी जिल्हा संघटनेचे संदीप तावडे, राज्य क्रीडामार्गदर्शक सचिन मांडवकर, शैक्षणिक संचालिका सौ. शरयू यशवंतराव, प्रसाद परांजपे, अजित गाळवणकर, क्रीडा संचालक श्रीकांत पराडकर आदि मान्यवर उपस्थित होते. स्पर्धेत महाड (रायगड), सांगली, सातारा, कोल्हापूर, पालघर येथूनही स्पर्धक सहभागी झाले होते.

स्पर्धेचा निकाल (अनुक्रमे प्रथम पाच क्रमांक)-

**१२ वर्षांखालील मुले** (२ किमी)- श्रावण साळुंखे, समर्थ सुर्वे, पार्थ पवार, रवी कश्यप, वेदांत खेराडे; **मुली** (२ किमी )- अबोली वास्के, आराध्या वास्के, भूमी म्हात्रे, रुद्र शिवगण, अनुष्का राणीम

**१४ वर्षांखालील मुले** (३ किमी)- अथर्व चव्हाण, प्रणीत खळे, अथर्व दवंडे, रोषण राठोड, विराज पाटील; **मुली** (२ किमी)- हुमेरा सय्यद, पूजा सावंत, सृष्टी नागरपोळे, हर्षदा जोशी, मुक्ता भुवड

**१६ वर्षांखालील मुले** (४ किमी)- अथर्व ताटे, सोहम साळुंखे, स्वागत पाटील, कार्तिक भूसेर, साईप्रसाद वराडकर; **मुली** (३ किमी) -अनुजा पवार, आरोही पालखडे, तन्मयी जाधव, पल्लवी हुमणे, समिक्षा जस्वान

**१८ वर्षांखालील मुले** (६ किमी)- स्वराज गुढेकर, सुयश खरात, ऋषिकेश रेवाळे, दरेश्वर शेजूळ, बिबेक मौनी; **मुली** (४ किमी)- मंजिरी गावडे, आदिबा तंबू, अनुश्री आंबेकर, निधी शिगवण, वनिता खरात.

स्पर्धेतील विविध गटातील प्रथम पाच क्रमांकांच्या खेळाडूंना रु. ५५ हजारांची रोख पारितोषिके, पदके आणि प्रमाणपत्रे देऊन मान्यवरांच्या हस्ते गौरविण्यात आले.



स्पर्धेला मुलींचाही जोरदार प्रतिसाद




प्रमुख पाहुण्या आंतरराष्ट्रीय धावपटू ईशा जाधव यांच्या हस्ते पारितोषिक वितरण

# एसव्हीजेसीटी क्रीडासंकुलातील जलतरणपटूंची सुवर्ण कामगिरी



*डावीकडून - ओवी बोंडे, तन्मयी जाधव, आरोही पालखडे, प्रशिक्षक विनायक पवार, कनिष्क घाग, अभंग बोंडे*

जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय रत्नागिरी अंतर्गत जिल्हास्तरीय शालेय जलतरण स्पर्धा दि. ३० सप्टेंबर २०२४ रोजी रत्नागिरी येथे पार पडली. यामध्ये एसव्हीजेसीटी क्रीडासंकुलातील १४ व १७ वर्षे वयोगटामध्ये ७ जलतरणपटूंनी सहभाग नोंदविला होता. या स्पर्धेसाठी खेड, दापोली, लांजा, मंडणगड, चिपळूण, रत्नागिरी, संगमेश्वर, राजापूर या तालुक्यातून एकूण २००हूनही अधिक स्पर्धक सहभागी झाले होते.

या स्पर्धेमध्ये एसव्हीजेसीटी क्रीडासंकुलातील १४ वर्षे वयोगटात कनिष्क घागने १०० मी फ्री-स्टाईल प्रकारात प्रथम क्रमांक व १०० मी ब्रेस्टस्ट्रोक प्रकारात द्वितीय क्रमांक पटकावला. अभंग गोंडे या खेळाडूने ५० मी फ्री-स्टाईल प्रकारात द्वितीय क्रमांक पटकावला. १४ वर्षांखालील मुलींच्या गटात ओवी बोंडे हिने ५० मी फ्री-स्टाईल प्रकारात व १०० मी फ्री स्टाईल प्रकारात द्वितीय क्रमांक पटकावला.

१७ वर्षे वयोगटामध्ये तन्मयी जाधव हिने ५० मी बटरफ्लाय प्रथम क्रमांक, ५० मी बॅकस्ट्रोक प्रथम क्रमांक व २००मी इंडिव्हीज्युअल मिडले प्रकारात प्रथम क्रमांक मिळवून सुवर्ण कामगिरी केली. तसेच आरोही पालखडे हिने ४०० मी फ्री-स्टाईल, २०० मी फ्री-स्टाईल व १०० मी बटरफ्लाय क्रीडा प्रकारात प्रथम क्रमांक पटकावला. तसेच प्रेरणा मोंडे हिने ५० मी फ्री-स्टाईल , १०० मी फ्री-स्टाईल व ५० मी ब्रेस्टस्ट्रोक प्रकारात प्रथम क्रमांक पटकावला. या खेळाडूंची विभागीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे.

# डेरवण क्रीडासंकुलात विभागीय शालेय फुटबॉल स्पर्धा संपन्न

डेरवण क्रीडासंकुलात दि. २६ व २७ सप्टेंबर २०२४ रोजी विभागीय शालेय फुटबॉल स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेमध्ये कोल्हापूर जिल्हा, कोल्हापूर मनपा, सांगली मनपा, सांगली जिल्हा, इचलकरंजी मनपा, सातारा, सिंधुदुर्ग, रत्नागिरी या विभागातून एकूण ३०० खेळाडूंनी सहभाग घेतला होता.

या स्पर्धेच्या उद्घाटनप्रसंगी जिल्हा क्रीडा कार्यालयाचे क्रीडा अधिकारी विजय शिंदे, क्रीडा मार्गदर्शक सचिन मांडवकर, क्रीडा संचालक श्रीकांत पराडकर, क्रीडा शिक्षक प्रदीप साळुंखे, अशोक साळुंखे, रघू पाटील, कृष्ण गावडे, अजित दवडे आदि मान्यवर उपस्थित होते.

स्पर्धा निकाल पुढीलप्रमाणे :

१७ वर्षाखालील मुलांमध्ये कोल्हापूर मनपा आणि कोल्हापूर जिल्हा यांच्यात झालेल्या अंतिम सामन्यात कोल्हापूर मनपा या संघाने प्रथम क्रमांक पटकावला. तसेच कोल्हापूर जिल्हा द्वितीय क्रमांक आणि सिंधुदुर्ग संघाने तृतीय क्रमांक पटकाविला.

१७ वर्षाखालील मुलींच्या गटात कोल्हापूर जिल्हा आणि कोल्हापूर मनपा यांच्यात झालेल्या अंतिम सामन्यात कोल्हापूर जिल्हा या संघाने प्रथम क्रमांक पटकावला. तसेच कोल्हापूर मनपा द्वितीय क्रमांक आणि सातारा संघाने तृतीय क्रमांक पटकाविला.





# शालेय तालुका कबड्डी स्पर्धेत खेळाडूंचा विक्रमी सहभाग



*शालेय तालुका कबड्डी स्पर्धा - क्षणचित्र*



*शालेय तालुका कबड्डी स्पर्धा - क्षणचित्र*

एसव्हीजेसीटी क्रीडासंकुलात दि. २०, २१ व २३ सप्टेंबर २०२४ या कालावधीत शालेय तालुका कबड्डी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेमध्ये १४ वर्षांखालील मुलांमध्ये १८ संघ आणि मुलींमध्ये ०७ संघ, १७ वर्षांखालील मुलांमध्ये ३२ संघ आणि मुलींमध्ये १३ संघ तसेच १९ वर्षांखालील मुलांमध्ये १७ संघ आणि मुलींमध्ये एकूण ०६ संघ अशा एकूण ९३ संघांनी सहभाग नोंदविला होता. स्पर्धेतील सहभागी खेळाडूंची विक्रमी संख्या यावर्षी तब्बल १११६ झाली.

स्पर्धेच्या उद्घाटनप्रसंगी चिपळूण तालुका शारीरिक शिक्षण संघटनेचे अध्यक्ष राकेश खांडेकर, चिपळूण तालुका स्पर्धा समन्वयक समीर कालेकर, क्रीडा शिक्षक मोहसीन पटेल, रोहित गमरे, रामचंद्र चव्हाण पाटील, दत्तू बागुल, अमृत कडगावे, जीवन पाटील, महेश सावंत, ऋषिकेश ढगळे, अमोल सावंत, रुपेश कदम, मुकुंद पोटभरे, दादा पांढरे, उल्हास मोहिते, खेतमल चौरे, राजश्री टकले, गायत्री सोळुंखे, तहा शेख, एसव्हीजेसीटी क्रीडासंकुलाचे क्रीडा संचालक श्रीकांत पराडकर आदी मान्यवर उपस्थित होते.

या स्पर्धेत १४ वर्षांखालील मुलांमध्ये न्यू इंग्लिश स्कूल खेर्डी, सती संघाने अंतिम सामन्यात युनायटेड इंग्लिश स्कूल संघाचा पराभव करून विजेतेपद पटकावले. तसेच मो.आ. आगवेकर महाविद्यालय, अलोरे संघाने तृतीय क्रमांक पटकाविला. १४ वर्षांखालील मुलींमध्ये गोविंदराव निकम माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, सावर्डे संघाने अंतिम सामन्यात न्यू इंग्लिश स्कूल खेर्डी, सती संघाचा पराभव करून विजेतेपद पटकावले. तसेच युनायटेड इंग्लिश स्कूल संघाने तृतीय क्रमांक पटकाविला.

१७ वर्षांखालील मुलांमध्ये डी.बी.जे. कॉलेज, चिपळूण आणि गोविंदराव निकम माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, सावर्डे यांच्यात झालेल्या अटीतटीच्या अंतिम सामन्यात डी.बी.जे. कॉलेज, चिपळूण या संघाने प्रथम क्रमांक पटकावला. तर मोहन विद्यालय, आकले संघाने तृतीय क्रमांक पटकावला. १७ वर्षांखालील मुलींमध्ये युनायटेड इंग्लिश स्कूल, चिपळूण आणि न्यू इंग्लिश स्कूल खेर्डी, सती यांच्यात झालेल्या चुरशीच्या अंतिम सामन्यात युनायटेड इंग्लिश स्कूल, चिपळूण संघ विजयी ठरला. तर न्यू इंग्लिश स्कूल, वीर संघ तृतीय क्रमांकाचा मानकरी ठरला.

१९ वर्षांखालील मुलांमध्ये गोविंदराव निकम माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, सावर्डे संघ विजेतेपदाचा मानकरी ठरला. तर न्यू इंग्लिश स्कूल खेर्डी, सती संघाने द्वितीय क्रमांक पटकाविला आणि मो.आ. आगवेकर महाविद्यालय, अलोरे संघाने तृतीय क्रमांक पटकाविला. १९ वर्षांखालील मुलींच्या अंतिम सामन्यात डी.बी.जे. कॉलेज, चिपळूण संघाने मा. बाळासाहेब मते माध्यमिक विद्यालय, कामथे संघावर रोमहर्षक विजय मिळवून विजेतेपद पटकाविले. तसेच व. शं. देसाई माध्यमिक विद्यालय, असुर्डे संघाने तृतीय क्रमांक पटकाविला. या स्पर्धा बंदिस्त क्रीडांगणात जल्लोषात संपन्न झाल्या. चिपळूण तालुक्यातील खेळाडूंनी आपले कौशल्य दाखवून क्रीडारसिकांची मने जिंकली व अतिशय उत्तम खेळाचे प्रदर्शन केले.



*शालेय तालुका कबड्डी स्पर्धा - क्षणचित्र*

भक्तश्रेष्ठ कमलाकरपंत लक्ष्मण वालावलकर ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, रोगनिदान व संशोधन केंद्र
श्रीक्षेत्र डेरवण - ४१५६०६, ता. चिपळूण, जि. रत्नागिरी
दूरध्वनी : Reception No. (Hospital) : 8847790149 MSW (Social worker) : 9356427731
ई-मेल : info@walawalkarhospital.com वेबसाईट : www.walawalkarhospital.com

# जिल्हास्तरीय शालेय टेबल टेनिस स्पर्धा

एसव्हीजेसीटी क्रीडासंकुलात दि. २२ ते २३ ऑगस्ट २०२४ या कालावधीत जिल्हास्तरीय शालेय टेबल टेनिस स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. या स्पर्धेमध्ये जिल्ह्यातील एकूण २१९ खेळाडूंनी सहभाग घेतला होता. स्पर्धेच्या उद्घाटनप्रसंगी जिल्हा क्रीडा कार्यालयाचे क्रीडा मार्गदर्शक सचिन मांडवकर, क्रीडा संचालक श्रीकांत पराडकर, चिपळूण तालुका शारीरिक शिक्षण संघटनेचे अध्यक्ष राकेश खांडेकर, चिपळूण तालुका क्रीडा समन्वयक समीर कालेकर, क्रीडा शिक्षक उल्हास मोहिते, प्रवीणकुमार आवळे, मनिष काणेकर, लखन पाल, श्रीपाद गुरव, प्रदीप यादव, अनिकेत पवार आदि मान्यवर उपस्थित होते. जिल्ह्यातील खेळाडूंसाठी येथील आंतरराष्ट्रीय दर्जाच्या हॉलमध्ये अत्याधुनिक टेबलवर खेळण्याचा अनुभव नक्कीच प्रेरणादायी ठरेल. येथे नियमित आयोजित केल्या जाणाऱ्या सराव शिबिरांमुळे स्पर्धकसंख्याही यंदा वाढली आहे, असे टेबल टेनिस खेळातील अनुभवी प्रशिक्षक लखन पाल यांनी आपल्या मनोगतात सांगितले.

या स्पर्धेमध्ये सांघिक प्रकारात १४ वर्षांखालील मुलांच्या गटात वसंतराव भागवत माध्यमिक विद्यालय व कमलाबाई वामन पेढे ज्युनिअर कॉलेज, मार्गताम्हाने या संघाने गटात अव्वल स्थान प्राप्त करून सुवर्णपदक पटकाविले. तसेच सुरेश दामोदर गद्रे इंग्लिश मिडीयम स्कूल या संघाने रौप्यपदक पटकावले व न्यू इंग्लिश स्कूल, पोफळी या संघाने कांस्यपदक पटकाविले. १४ वर्षांखालील मुलींमध्ये पटवर्धन हायस्कूल, रत्नागिरी संघाने अंतिम सामन्यात बालभारती पब्लिक स्कूल, गुहागर संघाचा पराभव करून सुवर्ण पदक पटकाविले. तसेच न्यू इंग्लिश स्कूल, पोफळी संघाने तृतीय क्रमांक पटकाविला.

१७ वर्षांखालील मुलांमध्ये बालभारती पब्लिक स्कूल, गुहागर आणि सुरेश दामोदर गद्रे इंग्लिश मिडीयम स्कूल, चिपळूण यांच्यात झालेल्या अटीतटीच्या अंतिम सामन्यात बालभारती पब्लिक स्कूल गुहागर या संघाने प्रथम क्रमांक पटकावला. तर एम.एस.नाईक स्कूल, रत्नागिरी संघाने तृतीय क्रमांक पटकाविला. १७ वर्षांखालील मुलींमध्ये सुरेश दामोदर गद्रे इंग्लिश मिडीयम स्कूल, चिपळूण आणि वसंतराव भागवत माध्यमिक विद्यालय व कमलाबाई वामन पेढे ज्युनिअर कॉलेज, मार्गताम्हाने यांच्यात झालेल्या अटीतटीच्या अंतिम सामन्यात सुरेश दामोदर गद्रे इंग्लिश मिडीयम स्कूल, चिपळूण संघ विजयी ठरला. तर युनायटेड इंग्लिश स्कूल, चिपळूण संघ तृतीय क्रमांकाचा मानकरी ठरला.

१९ वर्षांखालील मुलांमध्ये सुरेश दामोदर गद्रे इंग्लिश मिडीयम स्कूल, चिपळूण संघ विजेतेपदाचा मानकरी ठरला तर न्यू इंग्लिश स्कूल, पोफळी संघाने द्वितीय क्रमांक पटकाविला. तसेच अभ्यंकर कुलकर्णी कनिष्ठ महाविद्यालय, रत्नागिरी संघाने तृतीय क्रमांक पटकाविला. १९ वर्षांखालील मुलींच्या अंतिम सामन्यात पटवर्धन हायस्कूल, रत्नागिरी संघाने सुरेश दामोदर गद्रे इंग्लिश मिडीयम स्कूल, चिपळूण संघावर रोमहर्षक विजय मिळवून विजेतेपद पटकाविले. तसेच डी. बी. जे. कॉलेज, चिपळूण संघाने तृतीय क्रमांक पटकाविला.



जिल्हास्तरीय शालेय टेबल टेनिस *स्पर्धा - क्षणचित्र*

**मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक :** श्री. विकास कमलाकर वालावलकर यांनी धनश्री ऑफसेट, ३/२०८, पत्रकार कॉलनी, कुवारबाव, रत्नागिरी येथे छापून भ.क.ल. वालावलकर ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, रोगनिदान व संशोधन केंद्र, डेरवण, पो. सावर्डे, ता. चिपळूण, जि. रत्नागिरी ४१५ ६०६ येथून प्रकाशित केले. Visit us at https://swamisamarth.com/dervan// कार्यकारी संपादिका : डॉ. सौ. सुवर्णा पाटील - ९९२१२ ५१६९५, सहसंपादक : सौ. शरयू यशवंतराव - ९८८१६ १९९७४, श्री. श्रीकांत पराडकर - ९५८८४ ७९२२०
नोंदणी क्रमांक : MAHMAR/2022/86035